**लातूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मुख्य स्वच्छता अधिकारी व सहाय्यक आयुक्त पदावरील पदोन्नतीस शासनाची मान्यता <u>देणेबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक:-लामपा-२०२५/प्र.क्र.२७९/नवि-२४**

४ था मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा मार्ग,

राजगुरू हुतात्मा चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २०.४.२०२६

**<u>संदर्भ:-</u>** १) सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६ ब,दि.१८.२.२०२१

२) सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६ ब,दि.७.५.२०२१

३) लातूर शहर मनपा निवड समिती दि.३.१०.२०२४

४) लातूर शहर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र.२४१, दि.७.१०.२०२४

५) आयुक्त तथा प्रशासक, लातूर शहर मनपा पत्र क्र जा.क्र.लामनपाला/सामान्य प्रशासन विभाग/७०९४/२०२४, दि.११.१०.२०२४

६) समक्रमांकाचे शासन पत्र दि.१.१०.२०२५

७) आयुक्त तथा प्रशासक, लातूर शहर मनपा पत्र क्र जा.क्र.लामनपाला/सामान्य प्रशासन विभाग/८७४१/२०२४, दि.६.१०.२०२५

**<u>प्रस्तावना</u>:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५४(१) अन्वये संदर्भ क्र.३ येथील गठीत निवडसमितीने दिनांक ०३.१०.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशीनुसार लातूर शहर महानगरपालिकेमध्ये मुख्य स्वच्छता निरीक्षक पदावर कार्यरत असलेले श्री. कलीम शेख यांना मुख्य स्वच्छता अधिकारी आणि अधीक्षक पदावर कार्यरत असलेले श्री. नंदकिशोर बाबूलाल तापडे, श्री. खदीर जिलानी शेख व श्री. विजय शरणाप्पा राजूरे या ३ अधिका-यांना सहाय्यक आयुक्त या पदावर लातूर शहर महानगरपालिकेच्या दि.४.१०.२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली. सदर पदोन्नतीस मान्यता देण्यास व शासनाच्या मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यास संदर्भ क्र.४ अन्वये लातूर शहर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. २४१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये मंजूरी देण्यात आली. त्यानुसार सदर ०४ अधिका-यांना लातूर शहर महानगरपालिकेच्या दि.४.१०.२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये दिलेल्या पदोन्नतीस मान्यता

देण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र.५ अन्वये आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी दि.११.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केला होता. तथापि, सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५(२) व लातूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम क्र.६ यांनुसार तसेच मुख्य स्वच्छता अधिकारी या पदावर पदोन्नती देताना लातूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम क्र.६ नुसार शासनाच्या पूर्व मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक असताना देखील पदोन्नतीचे प्रस्ताव हे कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याने आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांना संदर्भ क्र.६ येथील दि.१.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

२. आयुक्त, लातूर शहर मनपा यांनी दि.६.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाशामध्ये यापुढे लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१९ मधील नियम क्र.६ व महाराष्ट्र अधिनियमातील कलम ४५ अन्वये अधिकारी/कर्मचा-यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करुनच शासनाची पूर्व मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच पदोन्नती देण्यात येईल, याची दक्षता घेतली जाईल, असे नमूद करून मुख्य स्वच्छता अधिकारी व सहाय्यक आयुक्त या पदांवर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता देण्यात यावी, अशी विनंती आयुक्त, लातूर शहर मनपा यांनी संदर्भ क्र.७ येथील दि.६.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

३. आयुक्त तथा प्रशासक, लातूर शहर महानगरपालिका यांचे दिनांक ११.१०.२०२४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव विचारात घेऊन व दि ६.१०.२०२५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आलेला खुलासा मान्य करून लातूर शहर महानगरपालिकेच्या दि.४.१०.२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये महानगरपालिकेच्या ४ अधिका-यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीस शासनाची कार्योत्तर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवडसमितीने दि.३.१०.२०२४ रोजी एक मताने केलेली शिफारस, सदर शिफारशीनंतर चार अधिका-यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबतचे आयुक्त, लातूर शहर मनपा यांचे दि.४.१०.२०२४ रोजीचे कार्यालयीन आदेश, महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र.२४१, दिनांक ७.१०.२०२४ अन्वये दिलेली मंजुरी व त्यानुसार आयुक्त तथा प्रशासक, लातूर शहर महानगरपालिका यांचे दिनांक ११.१०.२०२४ रोजीचे पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव हे विचारात घेवून व दि ६.१०.२०२५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आलेला खुलासा मान्य करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५(२) व लातूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम क्र.६ नुसार श्री.नंदकिशोर तापडे, श्री.खदीर शेख व श्री. विजय राजूरे या ३ अधिका-यांना सहायक आयुक्त या पदावर आणि लातूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम क्र.६ नुसार श्री.कलीम शेख यांना मुख्य स्वच्छता अधिकारी या पदावर लातूर शहर

महानगरपालिकेच्या दि.४.१०.२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये देण्यात आलेल्या पदोन्नतीस शासनाची कार्योत्तर मान्यता मान्यता देण्यात येत आहे.

यानुसार आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी पुढील कार्यवाही करावी.

२. सदर पदोन्नती रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४.८.२०१७ रोजीच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन असेल.

३. यापुढे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५(२) अथवा लातूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम क्र.६ नुसार पदोन्नती देणे आवश्यक असलेले पदोन्नतीचे प्रस्ताव हे शासनाच्या कार्योत्तर मंजुरीसाठी सादर न करता विहीत प्रशासकीय प्रक्रिया पार पाडून शासनाच्या पूर्वमंजूरीसाठी सादर करण्याची दक्षता आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०४२०१५१६१३९७२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYANT VASANT WANI

Digitally signed by JAYANT VASANT WANI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ed8411d02826988b56bb8a80c92781268bc4b9d63f894022804b55bd1cea9847, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BFF25E350EA9446CC7F3B43987F8FFE247E43E10915A7723E889FCC11E2F43EB, cn=JAYANT VASANT WANI
Date: 2026.04.20 15:18:35 +05'30'

**( जयंत वाणी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खासगी सचिव,मंत्रालय.
३. मा.महापौर, लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
४. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
५. अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय.
६. उप सचिव (नवि-२४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय.
७. निवड नस्ती (नवि-२४)